


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २०० वा गुरूवार दि २५ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# मराठा आरक्षणावरुन महायुतीतच श्रेयवादाची लढाई? त्या पोस्टरवर फडणवीस काय म्हणाले?



वृत्तसंस्था/मुंबई

मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या निर्णयानंतर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी आपलं उपोषण मागे घेतलं. यानंतर राज्यभरात ठिकठिकाणी भाजपकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरणी पुष्प अर्पण करतानाचे पोस्टर झळकवण्यात आले. पण त्यांच्या या पोस्टरवरुन विरोधकांपेक्षा सत्ताधारी मित्रपक्षांचेच नेते नाराज झाल्याची चर्चा सुरु झाली. या पोस्टरच्या माध्यमातून भाजप मराठा आरक्षणाचं श्रेय एकटं घेत असल्याची भावना मित्रपक्षाच्या नेत्यांची झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात दबक्या आवाजात सुरु होती. याबाबत स्वत: देवेंद्र फडणवीस यांना एबीपी न्यूजच्या मुलाखतीत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली. आमच्या सहकाऱ्यांना काही अडचण झाली असं मानणं चुकीचं आहे. तसंच काहीच नाही. पोस्टरमध्ये मी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी पुष्प अर्पण करत आहे आणि त्या फोटोवर देवाभाऊ असं लिहिलं आहे. बाकी त्या पोस्टरमध्ये काहीच नाही. त्या पोस्टरवर भाजप पक्षाचं नाव नाही किंवा कोणत्याही कामाचं श्रेय घेतल्याचं लिहिलेलं नाही. एवढं साधं पोस्टर आहे. पण या साध्या पोस्टरने आमच्या विरोधकांना मिरची लागली, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली. हे पोस्टर माझ्या पक्षाने लावलं. याचा अर्थ असा आहे की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ मराठ्यांचे नव्हते. तर महाराजांनी त्यावेळच्या १८ पगड जातीच्या लोकांना एकत्र करत आपलं सैन्य तयार केलं होतं. आम्ही यापैकी कुणा एका बाजू घेऊ, मराठा समाजाचा मोठा इतिहास आणि योगदान राहिलेलं आहे. त्यामुळे या समाजाकडे आम्ही दुर्लक्ष करु शकत नाहीत. त्यासोबतच मागास वर्ग, ओबीसी समाजाला आम्ही दूर केलं तर आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारापांसून दूर जाऊ. त्यामुळे आम्ही आरक्षणाबाबत जो निर्णय घेतला त्या निर्णयामुळे मराठा समाजाला फायदा झाला. त्यासोबतच ओबीसी समाजात जी भीती होती ते झालं नाही. त्यामुळे त्याचा अर्थ असा होतो की, महाराज आम्ही आपल्या विचारांसोबत चाललो. पण ज्यांच्या मनात जातीवाद आहे. त्यामुळे त्यांना मिरची जास्त लागली, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली. माझ्या पक्षाने असा कुठला पोस्टर लावला तर माझ्या सहकाऱ्यांना काय अडचण होणार आहे? माझ्या सहकारी पक्षाच्या नेत्यांचं एक वाक्य त्या पोस्टरच्या विरोधात दाखवून द्या. माझ्या सहकाऱ्यांना मी चांगल्या पद्धतीने ओळखतो. मी त्यामध्ये कोणतंही क्रेडीट घेतलेलं नाही. मी फक्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी पुष्प अर्पण केलं आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

# उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे एकत्र येऊन राजकारणात भूकंप घडवणार?

वृत्तसंस्था/मुंबई

महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही घडू शकतं. याआधीच्या घडामोडींनी तर हेच दाखवून दिलं आहे. विशेष म्हणजे राजकारणात उद्या काय घडेल ते आपण आज सांगू शकत नाही हे स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सुद्धा सांगत आहेत. राज्यातले राजकीय समीकरण बदलले असले तरी आगामी काळात नव्या समीकरणांची नांदी बघायला मिळण्याची शक्यता आहे. ठाकरे बंधू एकत्र येताना दिसत आहेत. दुसरीकडे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबतही चांगले संबंध आहेत. तसेच त्यांचे देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतही चांगले संबंध आहेत. आगामी काळात मुंबई महापालिकेच्या निवडणुका आहेत. तसेच महायुतीत एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात शीतयुद्ध सुरु असल्याची चर्चा सुरु असते. यामुळे आगामी काळात शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे भविष्यात पुन्हा एकत्र येतील का? त्याचप्रमाणे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एकत्र येतील का? असे प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना एबीपी न्यूजच्या मुलाखतीत विचारण्यात आले. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. ङ्खमी आधीच क्रेडिट घेतलं आहे. त्यांनीदेखील मला क्रेडीट दिलं आहे. मी खूप खुश आहे. लोक म्हणतात, तुम्ही पक्ष फोडले. पण आम्ही फोडले नाही. लोक म्हणतात तुम्ही कुटुंब तोडले, पण आम्ही ते केलेलं नाही. पण आता कुणी म्हणत असेल की, तुम्ही कुटुंब जोडले तर त्याचं क्रेडिट मी नक्की घेईन. दोन्ही एकत्र राहावे. एकत्र निवडणूक लढावे. मला काही अडचण नाही, असं देवेंद्र फडणवीस राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्यावर म्हणाले. शिंदे-ठाकरे आणि पवार काका-पुतणे एकत्र होणार का? असाही प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना यावेळी विचारण्यात आला. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. ङ्खअसं काहीच होणार नाही. तुम्ही राजकारणाची वास्तविकता समजून घ्या. एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे नेहमी आमच्यासोबत राहतील. एनडीएत राहतील. राज्य आणि केंद्र सरकारचा हिस्सा बनून राहतील, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



देवेंद्र फडणवीस हे केंद्रात मंत्री होणार का? असा प्रश्न देखील त्यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी ङ्खजोपर्यंत इथे काम करायचं आहे तोपर्यंत इथे काम करणार. जेव्हा दिल्लीत काम करायचं सांगणार तेव्हा दिल्लीत काम करणार. जेव्हा सांगतील दोन्ही ठिकाणी काम करु नका तर मी स्वत:च्या घरी जाईन, अशी प्रतिक्रिया दिली. तसेच राजकारणात पुढचा रस्ता कुणालाच ठाऊक नसतो. महत्त्वकांक्षेला काही महत्त्व नसतं. राजकारणात उद्या काय होणार आहे ते आपण बोलू शकत नाहीत. त्यामुळे तुमच्या गोष्टी जेवढ्या संक्षिप्त आणि ताब्यात ठेवणार तेवढं चांगलं आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले

# कायद्याची भाषा कळेना...

## संपादकीय लेख

आपल्या सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनाचा असा कोणताही भाग उरलेला नाही, जो एखाद्या कायद्याने प्रभावित झालेला नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास हा कायद्याच्या कचाट्यात अडकलेला आहे, असे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्णा अय्यर यांनी म्हटले होते. १९७८ च्या एका निर्णयात ते पुढे म्हणतात, ङ्कपाश्चिमात्य देशांची नक्कल करून घाईघाईने तयार केलेले कायदे हे जनतेसाठी शिक्षा ठरतात. कायदा हा समाजाला दिशा देणारे साधन असायला हवा, पण तोच जर गोंधळ आणि विसंगती निर्माण करू लागला, तर त्याचा उपयोग समाजहितासाठी होत नाही. लोकशाहीत, कायदे नागरिकांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी, समाजरचना घडवण्यासाठी आणि न्यायव्यवस्था सक्षम ठेवण्यासाठी असतात, पण विरोधाभास असा की, कायद्याची भाषा एवढी गुंतागुंतीची असते की तो कायदा सामान्य माणसाच्या आकलनाबाहेर राहतो. खरं म्हणजे, कायद्याचा उद्देश स्पष्ट असायला हवा, पण गुंतागुंतीच्या आणि क्लिष्ट भाषेमुळे त्याचा अर्थ लावणे न्यायालयांनाही कठीण जाते. आपल्या देशाबद्दल बोलायचे झाले तर अशा उदाहरणांची एक जंत्रीच होईल. आरक्षण कायदा आल्यानंतर ङ्कसामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म हा शब्द नेमका कोणासाठी लागू होतो, हे स्पष्ट न केल्याने अनेक वर्षे वाद व खटले चालले. आयकर कायदा या संकल्पनेत कोणते स्रोत मोडतात? पगार, बोनस, भाडे, डिजिटल संपत्ती या संदिग्ध शब्दांमुळे प्रचंड वाद निर्माण झाले. १९८६ च्या पर्यावरण संरक्षण कायद्यात ङ्कपर्यावरणाला हानिकारक पदार्थफ हा शब्द अस्पष्ट ठेवल्यामुळे, कोणत्या उद्योगांवर कारवाई करावी याबाबत राज्यांना व न्यायालयांना वेगवेगळी भूमिका घ्यावी लागली. भाडेकरू कायद्यात ङ्कन्याय्य भाडेफहा शब्द नीट परिभाषित न केल्याने घरमालक आणि भाडेकरू यांच्यात कायमस्वरूपी वाद सुरू राहिला. **भारतीय न्याय संहितेत देशद्रोहाच्या व्याख्येत ङ्कडिसअफेक्शनफ ऐवजी ङ्कवेजिंग वॉरफ हा शब्द आणला असला तरी भाषेतील संदिग्धता तशीच आहे, यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकते. विशेष विवाह अधिनियमात ३० दिवसांची नोटीस अनेक जोडप्यांना छळाचा मार्ग मोकळा करून देते. ङ्कहरकतफ हा शब्द इतका अस्पष्ट आहे की वेगवेगळ्या न्यायालयांनी त्याचा वेगवेगळा अर्थ लावला. ङ्कमकोकाफमध्ये ङ्कसंघटित गुन्हेगारीफ किंवा ङ्कइन्सर्जन्सीफ यांसारख्या शब्दांची व्याख्या न ठरल्याने जमीर अहमद प्रकरणात सर्वोच्च न्यायालयालाच स्पष्टीकरण द्यावे लागले. पोक्सो कायदा हा बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी असलेला कायदा. तो किशोरवयीन मुलामुलींच्या संमतीच्या नात्यांनाही गुन्हा ठरवतो. कौटुंबिक न्यायालय कायदा (१९८४)मध्ये समुपदेशन, पुनर्मिलन व अधिकारक्षेत्र यांबाबत स्पष्ट तरतुदी नसल्याने राज्यागणिक त्याचा वेगवेगळा वापर होतो. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश नेमणूक करताना कॉलेजिअम प्रणाली ही भारतीय घटनेत कुठेही नमूद नाही. ती केवळ शब्दच्छल ( ) करून अस्तित्वात आणली गेली आहे. यामुळे न्यायपालिकेतील पारदर्शकता व उत्तरदायित्व यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. न्यायालयीन व्याख्या वापरून न्यायाधीश स्वतःच न्यायाधीशांची नेमणूक करतात, ही पद्धत भारतापुरतीच नव्हे तर जगातही एक अनोखी आणि वादग्रस्त बाब आहे. वस्तुतः भारतीय संविधानात सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश नेमणूक करताना राष्ट्रपतींनी मुख्य न्यायाधीशांशी ङ्कसल्लामसलतफ करावी अशी तरतूद आहे. (संदर्भ, राज्यघटना कलम १२४ (२), २१७ , २२२(१) ) पण या शब्दाचा अर्थ कालांतराने ङ्कसंमतीफ असा लावला गेला आणि ङ्ककॉलेजियमम प्रणाली अस्तित्वात आली. याबाबतीत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे की ङ्कन्यायाधीशांच्या नियुक्तीवर सरन्यायाधीश यांना व्यावहारिकपणे व्हेटो देण्याची परवानगी देणे, खरे तर सरन्यायाधीश यांचेकडे अधिकार हस्तांतरित करणे होय, जे अपेक्षित नाही. तरीही आज कॉलेजियम प्रणाली आल्यामुळे, संविधानातील भाषेचा थेट अर्थ न घेता सोयीस्कर अर्थ लावून घेतला गेला, असे अनेकांना वाटते. या प्रणालीमुळे जनतेत प्रचंड असंतोष अणि गोंधळ देखील निर्माण झाला आहे. परदेशात न्यायाधीश नेमणुकीसाठी अधिक पारदर्शक पद्धती अवलंबल्या जातात. ब्रिटनमधील यंत्रणा स्वतंत्रपणे उमेदवारांची निवड व शिफारस करते. न्यूझीलंडमध्ये न्यायाधीश नेमणूक प्रक्रियेत कार्यकारी आणि विधी सल्लागारांचा सहभाग असतो, पण त्यासाठी स्पष्ट नियमावली आहे. अमेरिकेत सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्राध्यक्ष करतात, पण सिनेटची संमती आवश्यक असते. यामुळे सार्वजनिक चर्चा व पारदर्शकतेला वाव मिळतो. कायद्याच्या शब्दांची क्लिष्टता हा फक्त भारतालाच नव्हे तर सर्व जगाला भेडसावणारा प्रश्न आहे. अमेरिकेतील कायदा (२०१८) हे त्याचे उदाहारण. परदेशी डेटासंबंधी बनवलेला हा कायदा इतका गुंतागुंतीचा आहे की न्यायालये, कंपन्या आणि परदेशी सरकारे सगळेच गोंधळले आहेत. ब्रिटनच्या कर कायद्यातील संदिग्धतेमुळे ङ्कहाऊस ऑफ लॉर्ड्सफला संसदेत झालेल्या चर्चेचा आधार घ्यावा लागला. न्यायालयाला कायदेमंडळाच्या मनात डोकवावे लागणे हेच अस्पष्ट भाषेचे दुष्परिणाम दाखवते. ऑस्ट्रेलियामध्ये साधी भाषा आणण्याचा प्रयत्न झाला तरी ङ्कअनजस्टफकिंवा ङ्कसिग्निफिकंट हार्मफ यांसारखे शब्द इतके संदिग्ध आहेत, की कौटुंबिक व ग्राहक कायद्यात त्यांना एकसंध निर्णय देता आले नाहीत. युरोपियन युनियनच्या डेटा संरक्षणाचा आदर्श मानला गेलेल्या ङ्कजीडीपीआरफमधील ङ्कलेजिटमेट इंटरेस्टफ किंवा ङ्कअनड्यू डिलेफ या शब्दांमुळे वेगवेगळ्या देशांत याची अमलबजावणी वेगवेगळ्या पद्धतीने होत आहे. ब्रिटिश तज्ज्ञ फ्रान्सिस बेनियन यांनी १९७५ मध्ये लिहिले होते  कायदा हा फक्त वकिलांसाठी नाही, तो प्रत्येक नागरिकासाठी आहे. पण जेव्हा कायदे अस्पष्ट भाषेत लिहिले जातात तेव्हा ते नागरिकांना परके वाटतात. या क्लिष्टतेमुळे नागरिकांचा कायद्यांवरील विश्वास कमी होतो. कायदे न समजल्याने ते परके वाटतात. न्यायालयांचा वेळ वाया जातो. तसेच न्यायव्यवस्थेकडून उशिराने मिळालेल्या न्यायामुळेही लोकांचा विश्वास ढासळतो. भारतात प्रलंबित खटल्यांची संख्या पाच कोटींपेक्षा जास्त आहे. गरीब आणि सामान्य नागरिक वर्षानुवर्षे न्यायाच्या प्रतीक्षेत खचून जातात. खटले अनावश्यकपणे लांबतात. सरकारी अधिकाऱ्यांचा वेळ अणि वकिलांचा खर्च वाढतो. अर्थ लावण्यावरच कोट्यवधी खर्च होतो. लोकशाही कमकुवत होते. कायदाच नागरिकांना समजला नाही, तर त्याचा नैतिक आधार हरवतो. कायदा हा फक्त वकिलांचा किंवा न्यायालयांचा विषय नाही, तर तो नागरिकांसोबतचा सामाजिक करार आहे. त्यामुळे तो सोप्या, स्पष्ट आणि सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत असणे गरजेचे आहे. ङ्ककायदा तांत्रिकदृष्ट्या योग्य असण्याइतकाच सामाजिकदृष्ट्याही समजण्यासारखा असला पाहिजे.फ सध्या नवनवीन कायदे तयार होत आहेत, उपलब्ध कायद्यात सुधारणा होत आहेत म्हणूनच संसद आणि कायदे करणाऱ्या संस्था यांनी या बाबतीत जबाबदारीने पावले उचलणे आवश्यक आहे. कायद्याची भाषा सर्वसाधारण माणसांना समजेल अशी पारदर्शक असावी, ही काळाची गरज आहे. विधिमंडळाने कायदे करताना गुंतागुंतीच्या भाषेऐवजी साधी, स्पष्ट व सरळ भाषा वापरण्याची वेळ आली आहे. कायद्यांच्या भाषेतील क्लिष्टतेचे धोके ध्यानात घेऊन नागरिकांसाठी पारदर्शक व सुटसुटीत भाषेतील कायदे किती आवश्यक आहेत, हे आता प्रशासन व शासक यांनी समजून घेतले पाहिजे.**






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नवा व्यवसाय, केंद्राची मदत

कोरोना व्हायसरमुळे देशात लॉकडाऊन करण्यात आल्याने अर्थव्यवस्था पुरती ंदावली आहे. कोरोनाशी लढतात अर्थव्यवस्थेला चालना द्यावी लागेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणात म्हटले होते. कोरोनाच्या संकटाला संधी म्हणून पाहायचे आहे. आतनिर्भर भारत या अभियानामुळे देशभरात नवीन ऊर्जा निर्माण झाली आहे. यासाठी त्यांनी २० लाख कोटी रुपयांचे विशेष आर्थिक पॅकेज जाहीर केले.

विशेष आर्थिक पॅकेजमध्ये ङ्गआतनिर्भर भारतफ योजना जाहीर करण्यात आली. ही योजना पाच खांावर उभारली जाईल, असे म्हटले गेले. यातील पहिला खां अर्थव्यवस्था, दुसरा खांब इन्फ्फ्रास्ट्र चर, तिसरा खांब आपली व्यवस्था तीही तंत्रज्ञानावर आधारित, चौथा खांब लोकसंख्याशास्त्र आणि पाचवा खांब मागणी, चड्चए क्षेत्राला कोणत्याही गॅरंटीशिवाय ३ लाख कोटी रु.चे कर्ज उपलब्ध होईल. समाजातील अनेक घटकांशी संवाद साधून हे आर्थिक पॅकेज तयार करण्यात आले आहे. या पॅकेजद्वारे देशातील विकास वाढवण्याची योजना आहे. त्यामुळे ङ्गआतनिर्भर भारतफ योजना म्हटले आहे.यामध्ये सूक्ष, लघू आणि मध्य उद्योगांच्या व्याख्येत बदल करून त्यांच्या गुंतवणूक व वार्षिक उलाढालीची यींदा वाढविण्यात आली आहे. या व्याख्येनुसार सूक्ष उद्योग १ कोटी रुपयांची गुंतवणूक व ५ कोटी रु.ची वार्षिक उलाढाल, लघू उद्योग १० कोटी रु. गुंतवणूक आणि ५० कोटी रु. उलाढाल, तर ध्य २० कोटी रु. गुंतवणूक, १०० कोटी रु.ची उलाढाल अशी व्याख्या करण्यात आली आहे. तसेच ५० हजार कोटी रुपयांचा एक विशेष निधीही जाहीर करण्यात आला आहे. याचा फ्फायदा त्या उद्योगांना होईल. जे चांगली कामगिरी करत आहेत, पण निधीअभावी त्यांना अडचणी येत आहेत, अशा उद्योगासाठी हा निधी वापरला जाईल.

सरकार यात १० हजार कोटी रु.ची गुंतवणूक करणार आहे. याशिवाय एमएसएमई क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारतर्फ्फे केल्या जाणाऱ्या २०० कोटी रुपयांपर्यंतच्या खरेदीसाठी ग्लोबल टेंडर न काढण्याची घोषणा करण्यात आली. लघू आणि कुटिर उद्योगांसाठी सहा ोठ्या योजना, लघू आणि कुटिर उद्योगांसाठी कोणत्याही गॅरंटीशिवाय ३ लाख रुपयांचे कर्ज देण्यात येणार, ४५ लाख लघू उद्योगांना ३१ ऑक्टोबरपासून याचा फ्फायदा मिळणार, अशा प्रकारे ही माहिती देण्यात आली आहे. अशा प्रकारे ही आतनिर्भर भारत योजना केंद्राने जाहीर केली आहे.

सर्व व्यवसायामध्ये ई-प्रणालीचा वापर करावा लागेल. आपला व्यवसाय व्होकल ते लोकल आणि लोकल ते ग्लोबल होण्यासाठीचा हा कसोटीचा काळ असेल. ार्केटध्ये तुमचा ाल खरेदी करण्यासाठी ग्राहकाच्या हातीही पैसा असणे आवश्यक असेल. आतनिर्भर योजनेतून नवीन उद्योग सुरू होतील. बेरोजगार व्यक्तींना काम मिळेल, पण कोणत्याही व्यवसायाचे साधे गणित आहे की, पहिली किमान दोन वर्षं तरी तुम्हाला व्यवसाय नो-प्रॉफ्फिट, नो-लॉस या तत्त्वावर करावा लागतो.

कोरोनाच्या काळात आत्म निर्भर भारत योजना आणि तरुण उद्योजकांना संधी म्हणून पाहिले, तर नव्याने व्यवसाय सुरू करण्यासाठी ही चांगली संधी आहे. पण कोरोनाच्या काळात भारतातच नव्हे, तर आशिया पॅसेफ्फिक देशात तरुण उद्योजकांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे.

आतनिर्भर भारत अभियानांतर्गत केंद्र सरकार व्यवसाय सुरू करणाऱ्यांना १० लाख रुपयांची मदत देत आहे. या मागील उद्देश आपल्याला आपल्या पायावर उभे करणे हा आहे. कोरोना साथीच्या रोगामुळे देशातील व्यापार क्षेत्राचा वेग मंदावला आहे. या काळात अनेक व्यवसाय रखडले आहेत, तर काहींना आपला व्यवसाय बंद करावा लागला. मात्र, आतनिर्भर भारत अभियानांतर्गत केंद्र सरकार व्यवसाय सुरू करणाऱ्यांना १० लाख रुपयांची मदत देत आहे. याम ागील उद्देश आपल्याला आपल्या पायावर उभे करणे हा आहे. कोरोना काळात बंद पडलेले व्यावसाय सुरू करण्यासाठी केंद्र सरकार पुन्हा लोकांना मदत करत आहे.

केंद्र सरकारच्या योजनेचा लाभ घ्या



आपल्याला स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा असेल, तर केंद्र सरकार आत्मनिर्भर भारत अभिनायांतर्गत (ओंरपळीलहरी इहरीरीं अलहळूरप) आपल्याला मदत करेल. या अतर्गत आपण नवीन व्यवसाय सुरू करू शकता किंवा आपला जुना व्यवसाय पुन्हा सुरू करू शकता. दोन्ही प्रकारच्या व्यवसायासाठी केंद्र सरकारकडून मदत केली जात आहे.

पंतप्रधान मुद्रा योजनेंतर्गत कर्ज उपलब्ध

केंद्र सरकारने पंतप्रधान मुद्रा योजना सुरू केली आहे. ही योजना अशा लोकांसाठी अधिक फ्फायदेशीर आहे, ज्यांच्याकडे कर्ज घेण्यासाठी बँकेने निश्चित केलेल्या अटी पूर्ण करण्याची क्षमता नसते. या योजनेंतर्गत देशातील कोणताही नागरिक ज्याच्याकडे कुटिर उद्योग किंवा कोणतीही भागीदारी कंपनी असेल तो कर्ज घेऊ शकतो.

तीन टप्प्यांत दिले जाईल कर्ज

पंतप्रधान ुद्रा योजनेंतर्गत तीन टप्प्यांत कर्ज दिले जाते. सरकारने याध्ये शिशू लोन, किशोर लोन आणि तरुण लोन अशी विभागणी केली आहे.

शिशू कर्ज योजना : या अंतर्गत दुकान उघडण्यासाठी ५०,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतले जाऊ शकते.

किशोर कर्ज योजना : या योजनेंतर्गत ५०,००० रुपयांपासून ते ५ लाखांपर्यंत कर्ज घेतले जाऊ शकते.

तरुण कर्ज योजना : जर तुम्हाला लघू उद्योग स्थापित करायचा असेल, तर तुम्ही ५ लाख रुपयांपासून १० लाख रुपयांपर्यंत कर्ज घेऊ शकता.

कोणाला मिळू शकते कर्ज

पंतप्रधान मुद्रा योजना लघू उद्योजक आणि व्यावसायिकांसाठी आहे. जर तुम्हाला एखादा मोठा व्यवसाय सुरू करायचा असेल, तर त्या अंतर्गत तुम्हाला कर्ज मिळू शकत नाही. या योजनेंतर्गत लघुउद्योग असेंब्लिंग युनिट्स, सर्व्हिस सेक्टर, दुकानदार, फ्फळ / भाजी विक्रेते, ट्रक ऑपरेटर, फ्फूड सर्व्हिस युनिट्स, रिपेअर शॉप्स, मशीन ऑपरेटर, लघू उद्योग, कारागीर आणि फ्फूड प्रोसेसिंग युनिटसाठी कर्ज घेऊ शकता.

कोठे मिळते कर्ज?

पंतप्रधान ुद्रा योजनेंतर्गत सरकारी बँकांकडून कर्ज घेतले जाऊ शकते. ग्रामीण बँकांदेखील यासाठी कर्ज देत आहेत. सहकारी बँकांकडूनही कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. आरबीआयने अधिकृत केलेल्या २७ बँका या योजनेंतर्गत कर्ज देऊ शकतात. याध्ये खासगी क्षेत्रातील १७ बँका, ३१ ग्रामीण बँका, ४ सहकारी बँका, ३६ म ायक्रो-फ्फायनान्स बँका आणि २५ बिगर-बँकिंग क्षेत्रातील फ्फायनान्स कंपन्या आहेत.

---

# टपटप टपटप टप्प टप्पाटप

अरुंधती, रंगात येऊन गात होती नि मुले टाळ्या वाजवून गात दाद देत होती. वर्गभर आनंद उधाणवारा झाला होता. निरीक्षक वर्गाबाहेर आडोशाला उभे राहून रंगले होते. हेडमास्तर येताच चेहरा गंभीर करून म्हणाले, काय चाललंय काय? हेडमास्तर बावरले. अस्सा गोंधळ घालतात बघा! कितीदा सांगितलं! गाऊ नका! गाऊ नका! पण ऐकायचं म्हणून नाव नाही. अहो, हेडमास्तर हे फार छान चाललंय. मी प्रसन्न आहे. निरीक्षक म्हणाले. हेडमास्तर गडबडले. असं का? मला आपलं वाटलं! कीः: काय? मी रागावलो? हो. हेडमास्तर धीर करून बोलले. शिक्षण ही आनंददायी अनुभवांची मालिका व्हावी, असं मला फ्फार वर्षांपासून वाटत आलंय. ते आज पूर्ण झालं. असं का? वा वा! चला आपण अरुंधतीचं कौतुक करूया. कोण? त्या टीचर? अरुंधती?

फार छान! गाणी सुरेख म्हणते. आवाजात धुरता आहे. हेडमास्तर शब्द जुळवीत कौतुकले. दुक्कल वर्गात शिरली. हेडमास्तर नि निरीक्षक. अरू गोंधळली. सॉरी सर. पुन्हा नाई गाणार. हेडमास्तरांना म्हणाली. अहो, अरूबाई गाः गाः गा तुम्ही. निरीक्षकांना आवडले, म्हणजे अरू ङ्गविशेषफ शिक्षकच झाली. हेडम ास्तर मनात म्हणाले. काय चाललंय! वर्ग स्तब्ध झाला. समजदार! झाला. नस्ते, मोठे सर वर्ग अभिवादन करीत म्हणालाः.

नमस्ते. अरुंधती ॅ, तुमचा आवाज पद्मश्री दर्जाचा आहे. थँक्यू सर. अरू ोठ्या त्रपणे म्हणाली. बाई गाण्याच्या कोविद आहेत, ोठे सर. बाई खूप छान गातात! स्तुतिसुमनांचा वर्षाव होऊ लागला. बरं हेडमास्तर गर झाले. वर्ग चिडीचूप! अहो, रागवू नका हेडमास्तर, दॅट डज हाऊ टीचिंग शुड बी! टाळ्या! मॉनिटरने आज्ञा केली. टाळ्या! कोरसचा गज्जर झाला. ही कविता कशी वाटली? जन्मात नाही विसरणार! पाऊस पडला मनभर. एक बोलकी प्रतिक्रिया आली. निरीक्षक, पण खूश आहेत अरूबाईवर. निरीक्षक मोकळेपणाने म्हणाले.

हेडास्तर उजळपणे म्हणालेः, माझंही अगदी तेच मत आहे. गा बघू. अरूंम नी शिकवलेलं गाणं! देश हा देव असे माझा! मॉनिटरने सुरुवात केली. वर्गाने सुरेल साथ दिली. निरीक्षक खूश! ९वीच्या मुलांनो, अरूबाई ब्राव्हो!

क्लास कंट्रोलचा जरा प्रॉब्लेम आहे. हेडास्तर मिठाचा खडा टाकीत म्हणाले. सर्वात मोठा कोण? देश, भारत. जोरात कोरस. क्लास कंट्रोल इज अ प्रॉब्ले.

हेडास्तर म्हणाले, जवळजवळ कुरकुरलेच! पण निरीक्षकांनी त्याकडे बिलकूल लक्ष दिले नाही. अरुंधतीला शाळेच्या बुकात ङ्गउत्कृष्टफ असा विशेष शेराही दिला. ङ्गदेशभक्त र्निाण करणारी शिक्षिका!फ कौतुक झाले. लेखी शेरा. आता अरूला कसे काढणार? इंटरनॅशनलचे ध्येय होतेः मुले ङ्गग्लोबलफ करणे. पालकांचा जोर वाढला होता. त्यांना आपली मुले यू. एस. ला पाठवायची होती. अरूला ङ्गगावठीफ म्हणून काढा! असाही रेटा होता.

हेडमास्तर मनाशी म्हणाले, ङ्गनिरीक्षक जाऊ देत.फः ङ्गमग आपलेच राज्य.फ पण, अरूचे शोधनिबंध लक लागून किंवा कस लागून पेपरात गाजले, वाजले. जे देशासाठी करता येईल, ते ते करा. परदेशात शिका; पण ती कला भारतात आणून, भारताचे ङ्गनावफ मोठे करा.फ्फ साक्षात पंतप्रधानांकडून शाबासकी. वा! वाहवा! तोंड दाबून ुक्यांचा मार. राज्यपुरस्कार चक्कः! क्या कमाल! है ना? अरुंधतीचा सरकारी पुरस्कार भरपूर गाजला,

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# डोक्यावर घुंघट घेऊन गेलेल्या जान्हवीत दिसली श्रीदेवीची छबी

## पण चाहते म्हणाले, रॉयल फॅमिलीतील विडो जणू....

**कपूर** घराण्यातील या लाडक्या अभिनेत्रीने अखेर कान्समध्ये पदार्पण केले. चित्रपट महोत्सवाच्या सुरुवातीपासूनच चाहते बोनी कपूर आणि दिवंगत अभिनेत्री श्रीदेवी यांची मुलगी जान्हवी कपूरला कान्सच्या रेड कार्पेटवर पाहण्यासाठी उत्सुक होते आणि आता रेड कार्पेटवर येताच तिने आपली हवा दाखवूनच दिली. ही सुंदरी तिच्या होमबाउंड चित्रपटाच्या स्क्रीनिंगसाठी सहकलाकार ईशान खट्टर आणि विशाल जेठवा यांच्यासोबत येथे आली होती. कान्स डेब्यूसाठी जान्हवीने तिची बहीण रिया कपूर हिची स्टाईल करण्यासाठी निवड केली होती. जिने जान्हवीला स्कर्ट, कॉर्सेट आणि पल्लू अशा अनेक घटकांचा वापर करून खूप सुंदरपणे सजवले. तिने डोक्यावर पदर घेतल्यामुळे तिच्यामध्ये सालस अशा श्रीदेवीची छबीही दिसत होती. पण तरीही हा लुक आणि तिचा ड्रेस चाहत्यांच्या काही अजिबातच पसंतीस उतरला नाही. सोशल मीडियावर अनेक जणांनी निगेटिव्ह कमेंट्स करत तिच्या या लुकला नावं ठेवली. एकदा पाहुया जान्हवीच्या या लुकमधील फोटोजजान्हवीला तिच्या डेब्यूसाठी भारतीय डिझायनरने डिझाइन केलेले कपडे घालायचे होते, म्हणून तिने तरुण ताहिलियानीची निवड केली. जान्हवीसाठी तरूणने एक कस्टम सॉफ्ट गुलाबी रंगाचा मॉडर्न लेहेंगा बनवला. खरं तर, त्याने कॉरसेटसोबत वॉल्यूमिनस स्कर्ट पेयर केला आणि सोबत ड्रामॅटिक ट्रेलचं कॉम्बिनेशन देखील दिलं. ज्यामध्ये तिचा ओव्हरऑल अपीअरंस पॉवरफुल होता.कस्टम मेड स्कर्ट आणि कॉरसेटला बनारसमध्ये रियल टिशू फॅब्रिकपासून बनवले गेले. ज्यावर हँड क्रश्ड टेकनिकने सुंदर टेक्सचर



ॲड केलं होतं जे लुकला क्लासी आणि रीच बनवत होतं. एवढेच नाही तर, तहिलियानीच्या सिग्नेचर ड्रेप स्टाइलसोबत त्यांची अटकट हेमला असंच सोडलं गेलं ज्यामुळे विणकामाचे खरे सौंदर्य समोर आले आणि जान्हवीच्या सौंदर्यात याने चार चाँद लावले.जाह्नवीचा लुक आकर्षक बनवण्यासाठी कॉर्सेटला गोल हाई सिंपल नेकलाइन दिली होती. त्याच्यासोबत हेवी वॉल्यूम स्कर्ट आणि साडीसारखं डोक्यावर घुंगट अर्थात पदर अटॅच केला होता. फॅब्रिकमधून येणारी शाईन आणि त्याचा ड्रॅप डिजाइन खूपच क्लासी होता. खासकरून ट्रेल आणि पदराला हातात लपेटलेली सेम फॅब्रिकची फ्लोरल लटकन लुकमध्ये ड्रामा क्रिएट करत होती. ज्याला जान्हवीने खूपच सुंदरतेने कॅरी केले होते.

---

# विधानपरिषदेसाठी दादांचा उमेदवार ठरला, एकाच घरात दोन आमदार, आमदाराच्या नवऱ्यालाच तिकीट...

वृत्तसंस्था/मुंबई

विधान परिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी २७ मार्चला निवडणूक पार पडणार आहे. त्यापैकी तीन जागा भाजपच्या वाट्याला आल्या आहेत, तर प्रत्येकी एक जागा ही शिवसेना आणि अजित पवार गटाला मिळाली आहे. त्यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून उमेदवाराचं नाव जाहीर करण्यात आलं आहे. राष्ट्रवादीकडून संजय खोडके ( ) यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे आता एकाच घरात पती-पत्नी आमदार पाहायला मिळणार आहेत.पाच विधान परिषदेच्या ( २०२५) जागांसाठी भाजपकडून तीन नावांची घोषणा करण्यात आली आहे. भाजपकडून संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर, शिवसेना शिंदे गटाकडून माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यानंतर आता राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून संजय खोडके यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली आहे.अजित पवार गटाकडून झिशान सिद्दीकी यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरु होती. त्यांना उमेदवारी मिळणार असं बोललं जात होतं. मात्र, त्यांच्या नावाला पक्षांतर्गत प्रचंड विरोध होता. त्यानंतर काही अजून नावही चर्चेत होती. मात्र, आता एक वेगळंच नाव समोर आलं आहे. संजय खोडके यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.



विधान परिषदेच्या पाच जागा रिक्त असल्याने त्यासाठी २७ मार्चला निवडणूक होणार आहे. त्यासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अखेरची तारीख आहे. विधानसभेवर निवडून गेलेल्या पाच विधान परिषद सदस्यांच्या राजीनाम्यामुळे या जागा रिक्त झाल्याने त्या जागांवर ही निवडणूक होत आहे. त्यामध्ये भाजपच्या वाट्याला तीन तर राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडे प्रत्येकी एक जागा आली आहे. या पाचही जागांसाठी आता उमेदवारांच्या नावांची घोषणा झाली आहे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गोडाचा गोडवा श्रीखंड



श्रीखंड महाराष्ट्राची स्वीट डिश! महाराष्ट्रामधील खाद्यसंस्कृतीमध्ये श्रीखंड या पदार्थाला जास्त महत्त्व आहे. कोणतेही शुभकार्य असले की, घरामध्ये श्रीखंड-पुरीचा बेत तयार केला जातो. श्रीखंड विविध प्रकारात मिळते, जसे की केसर-पिस्ता श्रीखंड, आम्रखंड, फ्रुट श्रीखंड इ. सोबतीला गरमागरम पु-या असल्या तर किती छान!

कुठलेही सणवार हे गोडाधोडाशिवाय अपुरेच. सणांचं आणि गोडाचं नातं खूप घट्ट आहे अन् हे आपण आपल्याच काय इतर संस्कृतींमध्येही बघतो. अगदी प्रत्येक संस्कृतीत त्यांचा त्यांचा एक विशिष्ट गोड पदार्थ हा ठरलेला असतोच. एकूणच काय तर गोडाचा गोडवा हा खास क्षणांसाठी असतो, मग ती जिलेबी असू देत नाहीतर हलवा, खीर असू दे नाहीतर श्रीखंड या सगळ्या पदार्थांची आपलीच एक मज्जा आहे. गोड विषयावर सणावारांना केल्या जाणा-या या पदार्थामागे एक विशिष्ट इतिहास आणि तसेच त्याची वैज्ञानिक कारणही आहेत.

गोडधोड पदार्थाशिवाय नवीन वर्षाच्या उत्साहाची कल्पनाच होऊ शकत नाही. काही सण आणि गोडाचे पदार्थ यांचं नातं अतूट आहे. गुढीपाडव्याच्या सणाशी जोडला गेलेला गोड पदार्थ म्हणजे श्रीखंड. डाएटच्या कल्पनेने दक्ष झालेली मंडळीसुद्धा श्रीखंडाची बोटभर चव चाखल्याशिवाय राहात नाहीत. मग अगदी जातिवंत खवय्यांविषयी काय बोलावे? श्रीखंड-पुरीचा बेत म्हणजे सणाचा आनंद लुटून झाल्यावर दोन-चार तासांच्या निवांतपणाची ग्वाहीच. श्रीखंड हा दुधापासून बनणारा खास मराठी-गुजराती गोड खाद्यपदार्थ आहे. अतिशय साध्या रूपात श्रीखंड म्हणजे चक्का आणि साखरेचे मिश्रण म्हणता येईल. या मिश्रणात अधिक चवीसाठी सामान्यत: बदाम-पिस्ता, काजू, केशर, वेलदोडा, आंब्याचा रस (आमरस) इ. पदार्थ मिसळले जातात. आमरस मिळवला असता या पदार्थास आम्रखंड असे म्हणतात. हा महाभारतकालीन खाद्यपदार्थ असून तेव्हा त्यास शिकरणी या नावाने ओळखले जायचे. जुन्या काळी ८ प्रकारच्या शिकरणी बनत असत, असा उल्लेख सापडतो. असं म्हणतात की, महाभारतात महापराक्रमी भीम जेव्हा विराट राजाकडे बल्लवाचार्य म्हणून काम करत होता, तेव्हा त्याने शिखरिणी नामक पदार्थ बनवल्याचा उल्लेख येतो. त्या शिखरिणीत भीमाने ताजी फळे वापरल्याचा संदर्भ आहे. आजच्या फ्रूट श्रीखंडाचे मूळ थेट भीमापर्यंत मागे गेलेले पाहून गंमत वाटते. दुकानदार मंडळी सीताफळ श्रीखंड, स्ट्रॉबेरी श्रीखंड विकताना अशी जाहिरात करतात की, जणू काही हा नवा प्रयोग त्यांनीच केला असावा. पण यापुढे त्यांना ठामपणे भीमाचा दाखला देता येईल. जुन्याच पदार्थाचं हे नवं रूप चवीला मात्र इतक्या हजारो वर्षानंतरही तितकंच मिट्ट गोड राहिलेलं आहे. अर्थात या श्रीखंडाच्या पाऊलखुणा भीमापर्यंत मागे जात असल्या तरी काही संशोधकांच्या मते, श्रीखंडाची कृती त्या आधी अस्तित्वात आली असावी. गुराखी मंडळी वा कुणीही यात्रेकरू सोबत दही घेऊन प्रवासास निघाले असता, खाली ठेवल्यास दही ओघळेल या भीतीने ते त्यांनी वर टांगले असावे. सकाळी घट्ट झालेला चक्का त्यात गोड काही मिसळून खाल्ल्यावर अधिकच छान लागतो हे त्यांना जाणवले असावे. त्यातून पुढे सामान्य लोकांकडून राजदरबारी स्वयंपाकघरात या साध्याशा पदार्थावर शाही सजावट होऊन श्रीखंड लोकप्रिय झाले असावे, असा अंदाज आहे. आपण या सगळ्या पदार्थाच्या इतिहासाचे ठळक टप्पे शोधू शकतो, पण त्यांच्या निर्मितीमागची प्रेरणा ब-याचवेळा जर तरफ्च्या चक्रातच अडकलेली राहाते. इतिहास तर असेही सांगतो की, श्रीकृष्णने घीवर हे पक्वान्न स्वत: शोधलं.

महाराष्ट्रामधील खाद्यसंस्कृतीमध्ये श्रीखंड या पदार्थाला जास्त महत्त्व आहे. कोणतेही शुभ कार्य असले की, घरामध्ये श्रीखंड-पुरीचा बेत तयार केला जातो. पण हे श्रीखंड आले तरी कुठून याचा शोध घेतल्यास संस्कृत साहित्यामध्ये त्याचे उल्लेख आपल्याला दिसतात. क्षीर आणि खांड या दोन शब्दांपासून या शब्दाची निर्मिती झाली आहे. या शब्दामधील क्षीर म्हणजे दूध तर खांड म्हणजे साखर होय. हा पदार्थ महाराष्ट्रासोबत राजस्थानमध्ये सुद्धा बनवला जातो. श्रीखंडमध्येसुद्धा अनेक प्रकार येतात, त्यामध्ये आम्रखंड याचा समावेश होतो. महाराष्ट्रामध्ये श्रीखंडामध्ये पाणी टाकून पीयूष हा प्रकार सुद्धा केला जातो. श्रीखंड या शब्दाची निर्मिती आणि उगम याविषयी दोन विचार आढळतात. काहींच्या मते प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या शिखरिणी या पदार्थनामाचा अपभ्रंश म्हणजे श्रीखंड. तर काहींच्या मते क्षीर-खंड यापासून श्रीखंड हा शब्द निर्माण झाला असावा. क्षीर अर्थात दूध, त्याचे दही आणि त्यापासून निर्माण श्रीखंड असा हा प्रवास आहे. भारतात एकेकाळी दुधदुभत्याला काहीच कमी नव्हती. त्यामुळे श्रीखंडासारखा पदार्थ सणासुदीच्या निमित्ताने लोकप्रिय झाला यात आश्चर्य नाही. गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, पंजाब ही राज्यं श्रीखंडाच्या लोकप्रियतेत वरचा क्रमांक पटकावून आहेत. महाराष्ट्रात तर परप्रांतीय, गोड पदार्थाची ओळख होईस्तोवर सणासुदीला होणा-या गोडाच्या पदार्थात श्रीखंडाचा क्रमांक अव्वल होता.

होळीत पुरणाची पोळी, गणपतीला मोदक अशी गणितं पक्की असली तरी उरलेल्या सणांना श्रीखंडाची निवड अधिकतर होताना दिसायची. फ्रूट श्रीखंडाचा इतिहास महाभारतापर्यंत मागे नेताना आम्रखंड ही मात्र खास महाराष्ट्रीय आणि गुजराती जेवणाची खासियत आहे. आज गुलाबजाम, रसगुल्ला, अंगुरबासुंदी यांच्या समान वाढत्या प्रभावात श्रीखंड हा अनेकातला एक पर्याय होऊन राहिला असला तरी पंचपक्वान्नांच्या पंगतीला श्रीखंडाचा मान आजही तितकाच मोठा आहे. मराठी जेवणाच्या शाही पंगतीचा श्रीखंडपुरी हा आकर्षणबिंदू म्हणता येईल. घरच्याघरी बनवलेले वा आताच्या काळाच्या सोयीने तयार मागवलेले श्रीखंड, तेलात न्हाऊन आलेल्या पुरीच्या सोबतीने मुखात विसावताना आज आनंदी आनंद झालाचा फील आपोआप देते. इतरवेळी पंगतीचे शिष्टाचार काटेकोरपणे पाळणारे आपण बोटाने श्रीखंड उचलून तोंडात चाटवताना कोण काय म्हणेल याच्या पलीकडे आलेले असतो. या श्रीखंडाचा मिट्ट गोडपणा आपल्याला त्या खाद्यतंद्रीकडे अलगद घेऊन येतो. जेवण आटोपल्यावर येणारी सुस्ती, ही तंद्री पुढचे काही तास टिकवून ठेवते. श्रीखंडाचे साफल्य हे आपल्याला या भावावस्थेपर्यंत आणण्यातच आहे.

# ब्रिटनमध्ये शालेय विद्यार्थ्यांना शिकवला जातोय दयाळूपणा

भारतीय संस्कृती ही अतिशय प्राचीन आणि उच्च मानली जाते. त्यामुळेच या संस्कृतीचा सर्वत्र आदर सन्मान केला जातो. दयाळूपणा हा भारतीयांच्या ठाई असलेला एक प्रमुख गुण आहे. मात्र, हाच दयाळूपणा आता ब्रिटनमधील शाळांमधील अभ्यासक्रमाचा एक भाग झाला आहे.आजकाल ब्रिटनच्या शाळांमध्ये मुलांना दयाळू बनवण्यासाठी सामाजिक चळवळफ सुरू आहे. मुलांना दयाळूपणाची शक्ती जाणवून दिली जात आहे. खरंच, शाळांमध्ये दयाळूपणा हा अभ्यासक्रमाचा एक भाग बनवला जात आहे, जो लहानपणापासूनच दया करायला शिकवतो.तब्बल ३० हजारांपेक्षा अधिक शाळांनी दयाळूपणाला अभ्यासक्रमाचा भाग बनवले आहे. काईंडनेस यूके (घळपवपशीी णघ) या संस्थेने शिक्षक आणि शाळांना ५० हजारांहून अधिक दयाळूपणा किटचे वाटप केले आहे. या किटमध्ये दयाळूपणावर चर्चा करण्यापासून ते क्रियाकलापांपर्यंत मुलांना दयाळूपणा शिकवण्यासाठी डिझाइन केलेला कार्यक्रम समाविष्ट आहे. ब्रिटिश रेडक्रॉस सोसायटीदेखील शिक्षक आणि मुलांना दयाळूपणाच्या शक्तीची ओळख करून देत आहे. काइंडनेस यूकेचे सीईओ डेव्हिड जैमिली यांनी याबाबत सांगितले की, दया आणि परोपकाराची संस्कृती भारताच्या संस्कृतीत आधीपासूनच रुजलेली आहे.



शालेय अभ्यासक्रमात दयाळूपणाचा औपचारिक समावेश करून भारत जगासमोर एक उत्तम उदाहरण मांडू शकतो.

देशाची अफाट लोकसंख्या दयाळूपणाचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते, कारण अनेक प्रस्थापित आणि उदयोन्मुख देश नेतृत्वासाठी भारताकडे पाहतात.लॉनशिल अकादमीचे शिक्षक मॅकिंनटॉस म्हणतात की, हा एक चांगला नवोपक्रम आहे. आम्ही शाळांमध्ये दयाळूपणा सप्ताह साजरा करतो. दयाळूपणाचा मुलांच्या वेळापत्रकात समावेश करण्यात आला आहे.मुलांसाठी बाल दया समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रत्येक दयाळू गट स्वत:च्या संसाधनांचा वापर करून निधी उभारतो.मुलांना आठवड्यातून दयाळू कार्यांची ५ असाइनमेंटदेखील दिली जाते. यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो.

# अनुसूचित जाती युवक-युवतींसाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण

**जनसंचलन/बुलढाणा**

अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक व युवतींसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी), पुणे पुरस्कृत व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने एक महिन्याचा उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि. ८ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत बुलडाणा येथे होणार आहे. या प्रशिक्षणामध्ये उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, विविध उद्योगातील संधी, अन्नप्रक्रिया, कृषी प्रक्रिया, बेकरी उत्पादने, दुग्धजन्य प्रक्रिया, उद्योग उभारणीची प्रक्रिया, बाजारपेठ सर्वेक्षण, प्रकल्प अहवाल तयार करणे, उद्योगांना लागणाऱ्या विविध नोंदणी व परवाने, शासकीय योजनांची माहिती, उद्योगांना भेटी तसेच अभिप्रेरणा प्रशिक्षण या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. पात्रता व कागदपत्रे : उमेदवारांचे वय १८ ते ४५ वर्षे असावे, शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.), मार्कशीट, जातीचा दाखला, पॅनकार्ड, आधारकार्ड, पासपोर्ट साईज फोटो(झेरॉक्स प्रतींसह) व आवश्यक कागदपत्रासह एमसीईडी बुलडाणा कार्यालय, जिल्हा उद्योग केंद्र येथे किंवा ८२७५०९३२०१ वर संपर्क करावा. इच्छुक उमेदवारांनी वेळेत नोंदणी करून या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी यांनी केले आहे.

# शासकीय योजनांचा लाभ पाहिजे?

# मग फार्मर आयडी काढावाच लागणार !

## आतापर्यंत ४ लाख ४६ हजार शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी माहिती संच निर्मिती आणि शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जवळच्या नागरी सुविधा केंद्र (सीएससी) येथे नोंदणी करुन आपला फार्मर आयडी तयार करुन घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी प्रकल्पाची अंमलबजावणी जिल्ह्यात १२ डिसेंबर २०२४ पासून कॅम्प मोडमध्ये तसेच २१ जानेवारी २०२५ पासून नागरी सुविधा केंद्र आणि कॅम्प या हायब्रिड मोडव्दारे करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यात २४ सप्टेंबरपर्यंत ४ लाख ४६ हजार ५२२ शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यात आले आहे. जिल्ह्यात पी.एम. किसान योजनेचे एकूण ४ लाख ३४ हजार ४६८ लाभार्थी आहेत त्यापैकी आजअखेर ३ लाख २७ हजार ६२८ लाभार्थ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यात आले आहे. अद्यापपावेतो १ लाख ६ हजार ८४० शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक तयार झालेले नाही. त्यामुळे या उर्वरित शेतकऱ्यांनी तात्काळ शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करुन घ्यावे अन्यथा आपल्याला पी.एम. किसान योजनेचा लाभ मिळणार नाही, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व संयुक्त खातेदार व समाईक खातेदार यांनी प्रत्येक सहधारकांचा शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करुन घ्यावा. या ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक असून शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) असेल तरच शेतकरी बांधवांना विविध योजनांचा लाभ वितरीत करण्यात येणार आहे. तसेच लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरणाची (ई-केवायसी) आवश्यकता राहणार नाही. ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत आपला सातबारा आधारला लिंक करायचा असून शेतकऱ्यांना एक फार्मर आयडी मिळेल. फार्मर आयडी बनवला नाही तर पीक विमा, पीक कर्ज, पीएम किसान व विविध पीक अनुदान यांचा लाभ मिळणार नाही. फार्मर आयडीसाठी लागणारी कागदपत्रे आधार कार्ड, मोबाईल क्रमांक जो आधारला लिंक केला असेल, मोबाईल क्रमांक बँक खात्याशी लिंक असावा, सातबारा /गाव नमुना ८ अ, ही कागदपत्रे घेवून आपल्या जवळच्या नागरी सुविधा केंद्र (सीएससी) येथे नोंदणी करावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.




# मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व इतर शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित तसेच कायम विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी श्री. मोहनकुमार ग. व्यवहारे यांनी केले आहे. सन २०२५-२६ शैक्षणिक सत्रासाठी महाडीबीटी पोर्टल . वर नवीन तसेच नुतनीकरणाचे अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांनी योजनेची कार्यप्रणाली व इतंभुत माहिती करीता शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी २०२२ तसेच महाडीबीटी पोर्टलवरील सूचनांचा अभ्यास करून निर्धारित मुदतीत अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अभ्यासक्रम व पात्रता : अकरावी, बारावी, बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., बी.एसडब्ल्यू, एम.एसडब्ल्यू, बी.लिब., एम.लिब., ए.एन.एम., जी.एन.एम., डी.एड., बी.एड., एम.एड. तसेच शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण, कृषी, पशुधन व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील अनुसूचित जमातीचे विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेस पात्र आहेत. आवश्यक कागदपत्रे: बोनाफाईड प्रमाणपत्र, जातीचा दाखला, उत्पन्न प्रमाणपत्र, महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, टी.सी., शैक्षणिक मार्कशीट, जात वैधता प्रमाणपत्र.

# तळेगाव चाकणशिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग दुरुस्ती व रुंदीकरणासाठी ५९.७५ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता

**जनसंचलन/बुलडाणा**



तळेगाव चाकणशिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी (माजी राज्य महामार्ग ५५) कि.मी. ०/०० ते कि.मी. ५४/०० या मार्गाच्या दुरुस्ती व रुंदीकरणासाठी एकूण ₹५९.७५ कोटी निधीस मान्यता देण्यात आल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोंसले यांनी दिली आहे. तसेच या निर्णयामुळे तळेगावचाकणशिक्रापूर मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होईल, अपघातांचा धोका टळेल तसेच औद्योगिक वाहतुकीला मोठा दिलासा मिळेल, असे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री भोसले यांनी सांगितले. तळेगांव-चाकण-शिक्रापूर या मार्गात तळेगांव ते चाकण दरम्यान चार पदरी उन्नत मार्ग व जमिनीस समांतर चार पदरी रस्ता व चाकण ते शिक्रापूर दरम्यान सहा पदरी रस्ता या कामाचा समावेश आहे. हे संपूर्ण काम बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा (बी.ओ.टी.) तत्वावर बांधण्यात येणार आहे. या मार्गाचा समावेश पूर्वी राज्य रस्ते विकास आराखडा २००१२०२१ अंतर्गत करण्यात आला होता. त्यानंतर भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या रस्त्याला राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी असा दर्जा दिला असून, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून तो महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत तळेगावचाकणशिक्रापूर हा महामार्ग अतिवृष्टीमुळे खचला असून, रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती व रुंदीकरण आवश्यक झाले होते. हा मार्ग औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाचा असल्यामुळे येथे अवजड वाहतुकीची मोठी वर्दळ असते. परिणामी वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि रस्ता सुरक्षेच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. हा महामार्ग परिसरातील मुख्य रस्त्यांना जोडणारा एकमेव महत्त्वाचा रस्ता असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने दुरुस्तीची मागणी होत होती. यासंदर्भात ३० जुलै २०२५ रोजी पुणे जिल्ह्यात लोकप्रतिनिधी व संबंधित विभागीय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत रस्त्याच्या दुरुस्ती व रुंदीकरणासाठी तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार शासनस्तरावर पाठपुरावा करून आता आवश्यक निधीस मान्यता देण्यात आली आहे.

# महसूल विभागाच्या कामकाजाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा...

## उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे निर्देश...

जनसंचलन/बुलढाणा

महसूल विभागाच्या विविध कामकाजाचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आज घेतला. शासनाव्दारे राबविण्यात येणाऱ्या योजनाचा लाभ तसेच जिल्ह्यासाठी दिलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण करा, असे निर्देश यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित महसूल अधिकाऱ्यांना दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात महसूल विभागाचा आढावा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिलहाधिकारी समाधान गायकवाड, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, तहसिलदार विजय सवळे तसेच ऑनलाईनव्दारे सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांना शासनाच्या योजनासह अतिवृष्टी आणि इतर कारणांमुळे मिळणाऱ्या लाभासाठी ई-केवायसी पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण करुन घ्यावी. तसेच ॲग्रीस्टॅकची नोंदणी प्राधान्याने करुन घ्यावी. सेवा पंधरवाडा अभियानातंर्गत दि. २६ व २७ सप्टेंबर रोजी तालुकास्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करावे. शिबिरामध्ये शासनाच्या योजनांचा लाभ, ई-केवायसी, ॲग्रीस्टॅक नोंदणी, महसुली दाखले वितरण तसेच नागरिकांचे प्रलंबित प्रकरणांचे तात्काळ निवारण करण्यात यावे. जिल्ह्यातील विविध भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत. अवेळी पाऊस, अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचे शासनाव्दारे प्राप्त झालेला मदतनिधी तात्काळ वितरीत करावे.तसेच शेतजमिनी भोगवटदार दोनमधून भोगवटदार एकमध्ये रूपांतरित करण्यासाठी प्रयत्न करावेत. घरकुलाचे प्रकरणे तातडीने निकाली काढावीत व नागरिकांना नियमानुसार घरांसाठी वाळू उपलब्ध करुन द्यावी. सर्व तहसीलदारांनी गौण खनिज चोरीच्या प्रकरणांकडे गांभीर्याने लक्ष देऊन दंडात्मक कारवाई करावी, असे निर्देश डॉ. किरण पाटील यांनी यावेळी दिले.




आढावा बैठकीमध्ये जिंवत सातबारा, ई-चावडी ऑनलाईन वसूली, गाव नकाशा नोंदणी, पांदण रस्ता, ॲग्रिस्टॅक, घरकुल योजना, सेवा पंधरवाडा, ई-हक्क प्रणाली, ई फेरफार, ई पीक पाहणी, महसूल वसुली, गौण खनिज महसूल वसुली, न्यायप्रविष्ट प्रकरणे, इ. विविध विषयांचा सखोल आढावा घेण्यात आला.

# जिल्हा रुग्णालयात आंतरराष्ट्रीय आयुर्वेद दिवस उत्साहात साजरा

जनसंचलन/बुलढाणा

येथील जिल्हा रुग्णालयात मंगळवार दि. २३ सप्टेंबर रोजी १० वा आंतरराष्ट्रीय आयुर्वेद दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी तज्ज्ञांव्दारे मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे उद्घाटन आर्युवेद देवतेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रंजित मंडाले, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भागवत भुसारी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण घोंगटे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे आदी उपस्थित होते. डॉ. रंजित मंडाले यांनी आपल्या मार्गदर्शनात आयुर्वेदासह आयुष विभागातील विविध चिकित्सा पद्धतींची सर्वसामान्य आरोग्य सेवेत असलेली महत्वाची भूमिका अधोरेखित केली. डॉ. भागवत भुसारी यांनी आयुष विभागाच्या उपक्रमांचे कौतुक करताना पारंपरिक औषधोपचार आणि आयुर्वेदाच्या जागतिक महत्त्वावर प्रकाश टाकला. डॉ. प्रशांत तांगडे यांनी प्रास्ताविकातून आयुर्वेद दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमात जिल्हा रुग्णालयातील विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, आयुष विभागातील तज्ञ, परिचारिका प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते. कार्यक्रम यशस्वी आयोजनासाठी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक(आयुष) डॉ. शफात, सहाय्यक जिल्हा आयुष अधिकारी डॉ. कमर खान, होमिओपॅथी तज्ञ स्वाती लोखंडे धारस्कर, युनानी तज्ञ डॉ. अर्षद सय्यद, औ. नि. अ. आयुष रेखा शिंदे, शांता अंभोरे, सौरभ कुलकर्णी तसेच अन्य आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पंकज राठोड यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. शीतल ठाकरे यांनी मानले.

# जिल्हा नियोजन समितीची बैठक २६ सप्टेंबर रोजी होणार

जनसंचलन/बुलढाणा

परभणी जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागाच्या पाहणी दौऱ्यामुळे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद जाधव (पाटील) यांच्या अध्यक्षतेखाली २५ सप्टेंबर रोजी होणारी जिल्हा नियोजन समितीची बैठक शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर रोजी होणार आहे. ही बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये दि. १६ मे २०२५ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीच्या इतिवृत्तावरील अनुपालन वाचून अंतिम अहवाल करणे व सन २०२५-२६ जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी घटक कार्यक्रमाच्या अनुषंगाने दि. १७ सप्टेंबर अखरेचा मासिक प्रगती अहवालाचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच आयत्यावेळी येणाऱ्या विषयाबाबत कार्यवाही केली जाणार आहे. या बैठकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुखांनी आवश्यक माहितीसह स्वत: उपस्थित राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी पत्रकाद्वारे दिले आहेत.

# पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा


जनसंचलन/बुलडाणा

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे दि. २५ ते २७ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक व बुलढाणा अतिवृष्टी भागाची पाहणीकरीता जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार गुरुवार दि. २५ सप्टेंबर रोजी वाशिम येथून सोईनुसार(रात्री) शासकीय विश्रामगृह येथे आगमन व मुक्काम. शुक्रवार दि.



२६ रोजी दुपारी १२ ते २ वाजेपर्यंत नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे जिल्हा नियोजन समिती बैठक. त्यानंतर सोईनुसार बुलढाणा जिल्हा अतिवृष्टी पाहणी दौरा व सोईनुसार शासकीय विश्रामगृह येथे आगमन व मुक्काम. शनिवार दि. २७ सप्टेंबर २०२५ रोजी सोईनुसार शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथून साताराकडे रवाना.



# जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा शंखनाद!

## २७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी होणार जाहीर!

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. प्रत्येक जिल्ह्यात आता प्रशासन निवडणुकीच्या दृष्टीने प्राथमिक तयारीला लागलेले आहे. त्यासाठीच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासनाला दिले आहेत. राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने आज मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार प्रारुप मतदार यादीवर ८ ते १४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला आहे. त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे. जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यावर १४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. अंतिम मतदार यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी २७ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केली जाणार आहे. निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. या याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे अथवा नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरूस्ती करणे इत्यादी स्वरूपाची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. हरकती व सूचनांच्या अनुषंगाने केवळ मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुका, मतदाराचा चुकून निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील दुरूस्त्या हरकीत व सूचनांच्या अनुषांने केले

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# बुलडाणा जिल्हा लिकर असोसिएशन संघटनेच्या कोर कमिटीची कार्यकारिणी जाहीर!

**जनसंचलन/ चिखली**

मीरा सेलिब्रेशन येथे चिखली लिकर असोसिएशन तालुका संघटनेच्यावतीने बुलडाणा जिल्हा लिकर असोसिएशन संघटनेची कोर कमिटीची सभा नुकतीच पार पडली. सभेत संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेऊन आगामी काळातील कार्ययोजना निश्चित करण्यात आली आणि संघटनेची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.अध्यक्षपदी किशोर गरड, उपाध्यक्ष पदी विलास मुळे, राजेंद्र जैस्वाल, अनिल हांडे तर सचिवपदी सुरेंद्रसिंह ठाकुर यांची निवड झाली आहे.कोषाध्यक्ष माधव दुर्गळे, प्रसिद्धी प्रमुख प्रेमकुमार जैस्वाल,सहसचिव सोनू राउत, सह-कोषाध्यक्ष सोनिजी खर्चे तसचे जिल्हा सल्लागार राजेश मापारी, संतोष खंडेभराड, असीफभाई कलाल, रमेश उमाळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी किशोर गरड, सुरेंद्रसिंह ठाकुर, माधव दुर्गळे, विलास मुळे, अनिल हांडे, राजेश जैस्वाल, सोनू राउत, सोनाजी खर्चे, रमेश उमरकर, राजेश मापारी, संतोषभाऊ खांडेभराड, आसिफभाई कलाल, आत्माराम दुतोंडे, , राहुल झोरे, शिवशंकर पेठकर, अनिल चाटे, पंजावराव धनवे, दीपक काळे, संदीप श्रीवास्तव, योगेश जाधव, पुरुषोत्तम जैस्वाल, रमेश पंजाबी, विजय वाकोडे, धनराज डवले, सुनिलसिंह राजपुत, अनिल राठोड, संदीप बुरुकले, शिवा देशमुख, मयूर जैस्वाल, अरविंद मुळीक, राजेश अवचार, पिंटु जाधव, प्रेमकुमार जैस्वाल, सुशांत गावंडे, पांडुरंग सारोकार, दिलीप शिंगणे उपस्थित होते

# अखेर अन्यायग्रस्त मेंहेत्रे शेतकरी दांपत्याचे आमरण उपोषण स्थगित!

## अमोल मोरे यांच्या प्रयत्नाला यश!

**जनसंचलन/बुलढाणा**



सिंदखेडराजा येथील गेल्या सात दिवसांपासून सुरु असलेले अन्यायग्रस्त शेतकरी रामदास व सौ. मेहेत्रे यांचे आमरण उपोषण अखेर स्थगित झाले. बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. गुडदे साहेब , क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अमोल मोरे आणि कैलास भाऊ मेहेत्रे(शेतकरी संघर्ष समिती) यांच्या मध्यस्थीने हा तोडगा निघाला. शेतकरी दांपत्याने प्रशासनाकडे बांधकाम विभाग आणि नगरपालिका या विभागाने २०११मध्ये यांच्या शेतातून रस्ता केला होता,सदर रस्त्याची उंची जास्त घेतल्यामुळे श्री मेहेत्रे यांच्या शेतात पाणी साचत असे.त्या पाण्यामुळे दरवर्षी शेती पिकाचे नुकसान होत आहे म्हणून ते पाणी शेताच्या बाहेर काढण्याची मागणी करत होते. आठवड्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. दीर्घकाळ उपोषणामुळे शेतकरी दांपत्याची प्रकृती बिघडण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे प्रशासनावर मोठा दबाव वाढला होता.आज झालेल्या चर्चेत बांधकाम विभाग,नगरपालिका ,आणि मा.तहसीलदार साहेब यांच्यावर विश्वास ठेऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली काही मागण्यांचा तातडीने विचार करण्याची ग्वाही दिली. आणि शेतातील साचलेले पाणी, पाईप टाकून काढण्यात येईल अशी हमी देऊन, लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल असे आश्वासन देण्यात आले. या आश्वासनावर विश्वास ठेवून शेतकरी दांपत्याने उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. यावेळी तहसीलदार साहेब, नगरपालिकेचे सीईओ, पंचायत समितीचे बीडीओ साहेब यांनी उपोषणाला भेट देत.आपल्या मागण्या लवकरात लवकर पूर्ण केल्या जाईल असा विश्वास व्यक्त केला. शेतकरी दांपत्याने सात दिवसांच्या लढ्यात साथ दिलेल्या ग्रामस्थ, कार्यकर्ते व संघटनांचे आभार मानले